**ठळक बातम्या**

- इराण-इस्रायल संघर्षात अमेरिकेची उडी/ इराणच्या ३ अणुप्रकल्पांवर केला हल्ला
- इस्रायलने केलं कारवाईचं स्वागत, तर संयुक्त राष्ट्रांनी व्यक्त केली चिंता
- ऑपरेशन सिंधु मार्फत १ हजार ११७ भारतीयांना परत आणण्यात यश
- पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेनं केली दोन जणांना अटक
- लडाखमध्ये आयोजित सरहद शौर्यथॉनचं महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

**आणि**

- २०२६च्या आयसीसी क्रिकेट टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेसाठी कॅनडाचा संघ पात्र

**<><><><>**

इराण-इस्रायल संघर्षात आता अमेरिकेनं जाहीररीत्या उडी घेतली आहे. अमेरिकेनं इराणच्या तीन आण्विक तळांवर हल्ला केला असून, हा हल्ला केल्यानंतर अमेरिकेची सर्व विमानं इराणी हवाई हद्दीबाहेर आहेत, असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाजमध्यमावरील संदेशातून जाहीर केलं आहे. इतर कोणताही पर्याय शिल्लक राहिला नसल्यानं अमेरिकेनं नाईलाजास्तव ही कारवाई केल्याचं त्यांनी म्हटलं आहे. तर इराणने आता शांतता प्रस्थापित करावी असं आवाहनही ट्रंप यांनी केलं आहे.

**<><><><>**

दरम्यान वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इस्रायली लष्करानं पश्चिम इराणमधल्या लष्करी तळांवर क्षेपणास्त्र हल्ले केले आहेत. इस्रायली सीमेनजीक इराणच्या हल्ल्यासाठी सज्ज असलेल्या क्षेपणास्त्र प्रक्षेपकांवर तसंच इराणच्या सशस्त्र दलातल्या सैनिकांवर हल्ले केल्याची माहिती इस्रायलच्या संरक्षण दलांनी आपल्या समाज माध्यमावर दिली आहे.

**<><><><>**

अमेरिकेनं इराणच्या तीन आण्विक तळांवर केलेल्या हल्ल्यांचा इराणनं तीव्र निषेध केला आहे. अमेरिकी सैन्यानं केलेला हल्ला आंतरराष्ट्रीय कायदा, संयुक्त राष्ट्रांची सनद आणि अण्वस्त्र प्रसार विरोधी कायद्याचं उल्लंघन करणारा आहे, असं इराणचे परराष्ट्र व्यवहार मंत्री सईद अब्बास अराघची यांनी म्हटलं आहे. या हल्ल्याचे परिणाम दीर्घकाळ राहतील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

अमेरिकेनं हल्ला केलेल्या फोर्डो, नतांज आणि एस्फहान इथं निवासी भागात कुठलाही धोका असल्याचं किरणोत्सार प्रणाली डेटा आणि क्षेत्रीय सर्वेक्षणात आढळलेलं नाही, असं इराणच्या अणुऊर्जा संस्थेनं म्हटलं आहे. अमेरिकेचे हल्ले आंतरराष्ट्रीय कायद्याचं उल्लंघन करणारे असून कायदेशीर कारवाईसह आवश्यक ती पावलं उचलली जातील. तसंच, आपले शास्त्रज्ञ अणुउद्योग विकसित करत राहतील, असं या संस्थेनं म्हटलं आहे.

**<><><><>**

इराणच्या अण्वस्त्र तळांवर हल्ला करण्याच्या अमेरिकेच्या निर्णयाबद्दल इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचं अभिनंदन केलं आहे. नेतन्याहू यांनी एका व्हिडीओच्या माध्यमातून ट्रम्प यांचं कौतुक केलं.

दरम्यान, संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरस यांनी अमेरिकेच्या इराणवरच्या हल्ल्यांमुळे पश्चिम आशियातला संघर्ष नियंत्रणाबाहेर जाऊ शकतो, असा इशारा दिला आहे. अमेरिकेचे हल्ले हा आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेसाठी एक मोठा धोका असल्याचं गुटेरस यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><>**

ऑपरेशन सिंधू अंतर्गत इराणमधे अडकेल्या अकराशे सतरा भारतीय नागरिकांना आतापर्यंत मायदेशी परत आणल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिली. ऑपरेशन सिंधू अंतर्गत इराणमधून पहिल्या टप्प्यात ११० नागरिकांना मायदेशी आणलं होतं. दुसऱ्या टप्प्यात २९०, तिसऱ्या टप्प्यात ११७, चौथ्या टप्प्यात ३१० नागरिकांना मायदेशी आणलं गेलं. तर पाचव्या टप्प्यात २९० नागरिक भारतात परतले. उरलेल्या नागरिकांनाही लवकरच मायदेशी परत आणलं जाईल, असं जयस्वाल यांनी सांगितलं.

ऑपरेशन सिंधू अंतर्गत भारतीय नागरिकांसह इराणमधून श्रीलंकेच्या नागरिकांना बाहेर काढण्यात वेळेवर मदत केल्याबद्दल श्रीलंकेनं भारत सरकारचे आभार मानले आहेत.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षात भारतानं सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांवर आधारित उपक्रमांमधून लक्षणीय बदल घडवला आहे. आज आपण पाहणार आहोत ऊर्जा क्षेत्रात गेल्या दशकभरात झालेली क्रांती.

**... व्हॉईस कास्ट-**

*(गेल्या दशकभरात भारतातल्या उर्जाक्षेत्रात मागणी आणि पुरवठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. त्यात नवीकरणीय आणि अपारंपरिक उर्जास्त्रोतांचा मोठा वाटा आहे. जून २०२५ पर्यंत देशाची एकूण उर्जाउत्पादन क्षमता ४७६ गिगावॅट्सपर्यंत पोहोचली आहे. सौर उर्जेच्या बाबतीत भारताचा आता जगात तिसरा क्रमांक लागतो तर पवन उर्जेच्या बाबतीत भारत जगात चौथ्या क्रमांकावर आहे. एप्रिल २०१८ पर्यंत देशातल्या १०० टक्के खेड्यांपर्यंत वीज पोहोचली. त्यात २ कोटी ८० लाख घरांचा समावेश आहे. वीज टंचाई दूर झाली. विजेचा दरडोई वापर ४५ टक्क्यांनी वाढला आहे. प्रधानमंत्री सूर्य घर योजनेमुले शेतकऱ्यांना उर्जानिर्मितीला प्रोत्साहन मिळत आहे. दरम्यान कोळसा उत्पादन क्षेत्राचंही आधुनिकीकरण झालं असून त्यावरचं अवलंबित्व आणि ताण कमी झाला आहे. एकूणच स्वच्छ आणि हरित उर्जा उत्पादनाच्या दिशेने भारताची दमदार वाटचाल सुरु आहे.)*

**<><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी एनआयए या राष्ट्रीय तपास यंत्रणेनं दोन जणांना अटक केली आहे. परवैझ अहमद जोथार आणि बशीर अहमद जोथार अशी त्यांची नावं असून त्यांच्याकडून आणखी तीन दहशतवाद्यांची महिती मिळाली असल्याचं एनआयएच्या सूत्रांनी सांगितलं. ते तिघे पाकिस्तानी नागरिक असून लष्कर ए तैयबाशी संबंधित आहेत. पहलगाममधे हिल पार्क इथं परवैझ आणि बशीर यांनी या तिघांना अन्न, निवारा आणि इतर मदत दिली होती. पुढचा तपास सुरु आहे.

**<><><><>**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज लडाखमध्ये आयोजित सरहद शौर्यथॉनला हिरवा झेंडा दाखवला. या मॅरेथॉनमध्ये देशभरातून अडीच हजारांहून अधिक धावपटू सहभागी झाले असून यातून देशाचा आपल्या लष्करावरचा दृढ विश्वास दिसून येत असल्याचं शिंदे यांनी यावेळी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. कारगील विजय दिवसाच्या

पार्श्वभूमीवर भारतीय लष्कर आणि सरहद संस्थेनं आयोजित केलेला हा उपक्रम जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये शांतता, देशभक्ती आणि पर्यटन या दृष्टीनं महत्त्वपूर्ण आहे, असं शिंदे यांनी सांगितलं. कारगिल युद्ध स्मारकासाठी महाराष्ट्र सरकारतर्फे तीन कोटी रुपयांचा धनादेश त्यांनी यावेळी लष्कराकडे सुपूर्द केला.

<><><><>

पुढच्या वर्षी होणाऱ्या आयसीसी क्रिकेट टी-२० विश्वचषक स्पर्धेत कॅनडाच्या संघानं स्थान मिळवलं  आहे. अमेरिकन पात्रता स्पर्धेत बहामाच्या संघावर विजय मिळवून कॅनडाच्या संघाने विश्वचषक स्पर्धेतलं आपलं स्थान निश्चित केलं. कॅनडासह आता एकूण १३ संघ या स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. यात भारत, श्रीलंका, अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, अमेरिका, वेस्ट इंडिज, आयर्लंड, न्यूझीलंड आणि पाकिस्तान यांचा समावेश आहे. उर्वरित ७ संघ यंदा वर्षअखेरपर्यंत विविध पात्रता स्पर्धांमधून निवडले जातील.

<><><><>

लंडनमध्ये अँडरसन - तेंडुलकर करंडक कसोटी क्रिकेट  मालिकेतल्या  पहिल्या सामन्यात भारताच्या पहिल्या डावातील ४७१ धावांना प्रत्युत्तर देताना इंग्लंडनं काल दिवसअखेर ३ गडी बाद २०९ धावा केल्या. भारताच्या पहिल्या डावात यशस्वी जयस्वाल, कर्णधार शुभमन गिल, उपकर्णधार ऋषभ पंत यांनी शतकं झळकावली. भारताचे उर्वरित गडी धावांची फार भर टाकू शकले नाहीत. लीड्स मैदानावर हा सामना सुरु असून आज सामन्याचा तिसरा दिवस आहे.

<><><><>

भारताची युवा टेनिसपटू माया राजेश्वरन हिनं जर्मनीत आयोजित आईटीएफ कनिष्ठ गट दोनशे, ग्लेडबेक टेनिस स्पर्धेत महिला एकेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. सोळा वर्षीय मायानं अंतिम फेरीत स्वित्झर्लंडच्या नोलिया मान्तान हिचा ६-२, ६-४ असा सहज पराभव केला. मायाचं आईटीएफ कनिष्ठ गट स्पर्धेतलं हे पहिलंच विजेतेपद आहे.

<><><><>

नैर्ऋत्य मोसमी पाऊस मध्यप्रदेशात सक्रीय झाला असून येत्या दोन दिवसात मध्यप्रदेश, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, गुजरात, हिमाचल प्रदेश उत्तराखंड आणि पश्चिम

बंगाल आणि सिक्किमचा काही भाग इथं जोरदार पाऊस पडेल असा हवामानशास्त्रविभागाचा अंदाज आहे. पश्चिम किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता असून मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये असा इशारा देण्यात आला आहे.

पूर्व किनारपट्टीवर हवामान उष्ण आणि दमट राहील.

//<><><><>//